ePaper

## आ.रोहित पवारांकडून अधिकारी धारेवर; कार्यकर्त्यांनाही सुनावले खडेबोल

| वर्ष - 9 | अंक -28 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 19 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत

- श्रीलंकेचा अफगाणिस्तानवर विजय!
- ओमानविरूद्ध इंडियाची प्लेइंग ११
- ट्रम्प भारतावरील टॅरिफ हटवणार?
- ट्रम्प यांचा संसदेबाहेर १२ फुटी पुतळा

## मराठा आरक्षणः मराठा समाजासाठी सर्वात मोठा दिलासा

# मराठ्यांना हायकोर्टात सर्वात मोठं यश!

## आरक्षणाच्या GR विरोधातील याचिका न्यायाधीशांनी फेटाळली

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**मराठ्यांना हैदराबाद गॅझेटियरनुसार आरक्षण देण्याबाबतच्या सरकारच्या जीआरला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. याबाबतच्या निर्णयाविरोधात हायकोर्टात जीआरला विरोध करणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. वकील विनित धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज हायकोर्टात दोन सत्रात सुनावणी पार पडली. हायकोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. यानंतर हायकोर्टाने विनित धोत्रे यांची याचिका ग्राह्य धरण्याजोगी नाही, असं म्हणत याचिका फेटाळली. त्यामुळे मराठा समाजासाठी हा सर्वात मोठा दिलासा मानला जात आहे.**



### हायकोर्टाने नेमकं काय म्हटलं?

“याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेमधील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल तर त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी”, असं म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली. पण यावेळी मुंबई हायकोर्टाने एक महत्त्वाची मुभादेखील दिली आहे. याचिकाकर्त्यांनी वरच्या न्यायालयात जावं किंवा जीआरविरोधात इतर रिट याचिका ज्या दाखल करण्यात आल्या आहेत त्या इंटरलिंक करण्याची मुभा कोर्टाने दिली आहे.

सरकारकडून महाधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी मुंबई हायकोर्टात युक्तिवाद केला. शासन निर्णयाने शेड्यूल कास्टमधील कुणीही बाधित नाही, अशी माहिती महाधिवक्त्यांनी कोर्टात दिली. त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? असा प्रश्न हायकोर्टाने विचारला. तसेच जनहित याचिका ग्राह्य धरण्यास पात्र नाही, असं हायकोर्टाने स्पष्ट केलं. तसेच जनहित याचिकेच्या माध्यमातून प्रत्येक गोष्टीला आव्हान दिलं जाऊ शकत नाही, असंही हायकोर्ट म्हणालं.

### इतर याचिकांचं काय होणार?

मराठा आरक्षणाचा नवा जीआर लागू झाल्यानंतर ओबीसी समाजातील नेते मंडळी आणि अभ्यासकांमध्ये नाराजीचा सूर बघायला मिळाला. अनेक ओबीसी नेते नाराज झाले. त्यांनी हायकोर्टात जाण्याची तयारी केली. अनेकांनी हैदराबाद गॅझेटियरच्या नव्या जीआरला कोर्टात आव्हान देणाऱ्या याचिका दाखल केल्या आहेत. त्यापैकी पहिली याचिका वकील विनित धोत्रे यांनी दाखल केली होती. यानंतर अनेकांनी याचिका दाखल केल्या आहेत. हायकोर्टाने पहिल्या जनहित याचिकेवर आज सुनावणी घेत ती याचिका फेटाळून लावली आहे. पण मराठा आरक्षणाच्या नव्या जीआरला विरोध करणाऱ्या इतर याचिंकांबाबत हायकोर्ट काय निर्णय घेणार? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

### ओबीसी समाज आक्रमक


मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मोठा लढा उभारला आहे, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यात यावं अशी त्यांची मागणी आहे, या पार्श्वभूमीवर त्यांनी मुंबईमध्ये आंदोलन केलं. दरम्यान मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने त्यांची हैदराबाद गॅझेट लागू करण्याची मागणी मान्य केली आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर देखील काढण्यात आला. दरम्यान त्यानंतर आता ओबीसी समाज चांगलाच आक्रमक झाला आहे. ओबीसी समाजाकडून हैदराबाद गॅझेटच्या जीआरला विरोध होत आहे, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको, त्यांना स्वतंत्र्य आरक्षण देण्यात यावं अशी ओबीसी समाजाची मागणी आहे. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा ओबीसी विरूद्ध मराठा समाज असं चित्र निर्माण झाल्याचं पहायला मिळत आहे.

> “ आमचा न्याय देवतेवर विश्वास आहे, गोरगरिबांच्या बाजूने न्यायदेवता उभी राहाते, सरकारनंतर न्यायदेवता हीच गोरगरिबांचा आधार आहे. सरकारला त्यांची बाजू भक्कमपणे मांडावीच लागणार आहे.
>
> -मनोज जरांगे पाटील



## भुजबळांची प्रतिक्रिया

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर देखील पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी भुजबळांचा उल्लेख अलिबाबा असा केला आहे. येवल्याचा अलिबाबा दोन आरक्षण खात आहे, त्यांना लवकरच बेसन -भाकरी खावी लागेल असा खोचक टोला यावेळी जरांगे पाटील यांनी भुजबळ यांना लगावला आहे. मी गोरगरिबांसाठी सर्व काही करत आहे. समाजाला माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. काही अभ्यासकांनी समाजाला अजून काहीच दिलं नाही, मी माझं काम करत आहे, त्यामुळे समाजाने जे गैरसमज पसरवतात त्यांच्याकडे लक्ष देऊ नये, असं देखील यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान हैदराबाद गॅझेटची याचिका फेटाळून लावल्यानंतर भुजबळ यांची देखील प्रतिक्रिया समोर आली आहे. आम्ही सांगितलं होतं जनहित याचिका नको, रिट याचिका करा, आतापर्यंत आम्ही 4-5 रीट याचिका केल्या आहेत. असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे. तसेच लेकरंबाळ आमची देखील आहेत, असं म्हणत त्यांनी यावेळी मनोज जरांगे पाटील यांना टोला लगावला आहे.



पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ

## ९१ टक्के शेतकऱ्यांची भूसंपादनाला संमती

# पुरंदर विमानतळाचे टेकऑफ!

## जागा ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील ९१ टक्के शेतकऱ्यांनी भूसंपादनाला संमती दिली आहे. एकूण २ हजार ८०० शेतकऱ्यांनी २ हजार ७०० एकर जागा देण्याबाबतची संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाकडे दिली आहेत. त्यामुळे ही जागा ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळाला होणाऱ्या विरोधामुळे सरकारने साडेसात हजारांऐवजी तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय गेल्या महिन्यात घेतला होता. तसेच, विमानतळासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया २५ ऑगस्टपासून सुरू केली. जागा देण्यासाठी शेतकऱ्यांना १८ सप्टेंबरपर्यंत संमतिपत्रे देण्याची मुदत देण्यात आली होती. ही मुदत गुरुवारी संपुष्टात आली.या मुदतीमध्ये पुरंदर विमानतळासाठी आतापर्यंत २ हजार ८०० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ७०० एकर जमीन देण्याची संमती दिल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. संयुक्त मोजणीनंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचा दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना एकरकमी मोबदला देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष जमिनीचे संपादन करण्याची कार्यवाही केली जाईल, असेही जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. पुरंदर तालुक्यातील सातही गावांमध्ये सरकारच्या मालकीची सुमारे दोनशे एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे भूसंपादन केलेल्या जमिनीसह विमानतळासाठी सुमारे २९०० एकर जमीन उपलब्ध होणार आहे. दरम्यान, संमतिपत्रे देण्याची मुदत वाढविण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सहमतीने जमिनी देणाऱ्यांना 'प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर 'एरोसिटी'त एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी विमानतळाच्या परिसरात सुमारे सातशे एकर जागा राखीव ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार विमानतळासाठी सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना त्या मोबदल्यापोटी

### २,७०० एकर जमीनबाबत संमतीपत्रे

संयुक्त मोजणीनंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचा दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना एकरकमी मोबदला देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष जमिनीचे संपादन करण्याची कार्यवाही केली जाईल, असेही जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.पुरंदर तालुक्यातील सातही गावांमध्ये सरकारच्या मालकीची सुमारे दोनशे एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे भूसंपादन केलेल्या जमिनीसह विमानतळासाठी सुमारे २९०० एकर जमीन उपलब्ध होणार आहे.

एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंड आणि बाजारभावाच्या चार पट दराने मोबदला देण्यात येणार आहे. पुरंदर विमानतळासाठी दोनच धावपट्ट्या करण्याचे नियोजन आहे.

तसेच, विमानतळासाठी सुमारे २ हजार २०० एकर एवढे क्षेत्र असून, त्यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. भूसंपादनासाठी संमतिपत्रे देण्याच्या मुदतीमध्ये २ हजार ८०० शेतकऱ्यांनी २ हजार ७०० एकर जागा देण्याबाबतची संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत. पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळाला होणाऱ्या विरोधामुळे सरकारने साडेसात हजारांऐवजी तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय गेल्या महिन्यात घेतला होता. तसेच, विमानतळासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया २५ ऑगस्टपासून सुरू केली. जागा देण्यासाठी शेतकऱ्यांना १८ सप्टेंबरपर्यंत संमतिपत्रे देण्याची मुदत देण्यात आली होती. ही मुदत गुरुवारी संपुष्टात आली.या मुदतीमध्ये पुरंदर विमानतळासाठी आतापर्यंत २ हजार ८०० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ७०० एकर जमीन देण्याची संमती दिल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बोलताना दिली.

# ४२ हजार पाणी मीटर गोदामात पडून

## नागरिकांच्या विरोधामुळे समान पाणीपुरवठा योजनेला विलंब

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील प्रत्येक भागातील नागरिकांना समान पाणीपुरवठा व्हावा आणि गळती रोखण्यासाठी महापालिकेने २०१५ मध्ये मंजुरी दिलेल्या समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाणी मीटर बसविण्यास नागरिकांकडून विरोध होत असल्याने या योजनेला विलंब झाल्याचे निदर्शनास आले आहे.**



या योजनेनुसार दोन लाख ३२ हजार ६५२ पाणी मीटर बसविण्याचे उद्दिष्ट असताना अद्यापही ४२ हजार मीटर गोदामामध्ये शिल्लक असल्याने महापालिका प्रशासन हवालदिल झाले आहे. निवडणूक जवळ आल्याने राजकीय पक्ष हे बघ्याच्या भूमिकेत असल्याने प्रशासनापुढे प्रश्न निर्माण झाला आहे. पाणी वितरण व्यवस्थेमध्ये असणारी ४० टक्के गळती थांबवण्याबरोबरच प्रत्येक भागातील नागरिकांना समान आणि पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. पुढील ३० वर्षांचा विचार करून आणि शहराची पुढील काही वर्षांतील वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन ही

### पंपिंग स्टेशन ही कामे केली जाणार

विविध भागांमध्ये पाणी साठविण्यासाठी ७९ टाक्या बांधण्यात आल्या आहेत. पाणी वितरणासाठी १ हजार २६८ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या, १०१ किलोमीटर लांबीच्या पाणी साठवण टाक्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या आणि २ लाख ३२ हजार ६५२ पाणी मीटर बसवणे, ७ नागरी सुविधा केंद्र आणि ६ नवीन पंपिंग स्टेशन ही कामे केली जाणार आहेत.

योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेला महापालिकेच्या मुख्य सभेने मे २०१५ मध्ये मंजुरी दिली आहे. मात्र अद्यापपर्यंत ही योजना पूर्णत्वास गेलेली नाही.या योजनेच्या माध्यमातून मीटर बसविले जाणार आहेत. जे नागरिक जादा पाणी घेतील, त्यांच्याकडून अधिक बिल आकारले जाणार आहेमीटर बसविण्यासाठी नागरिकांचा विरोध होत असल्याने या योजनेचे काम थांबले आहे. त्यावर मीटर बसविण्यासाठी विरोध करणाऱ्या नागरिकांच्या विरोधात थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा इशारा महापालिकेने महिना-दीड महिन्यापूर्वी दिला होता.

## इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प

### भाजप आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

# राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मंजुरी!

## पिंपरी-चिंचवडच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा निर्णय

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील सुमारे 50 लाख नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या आणि महाराष्ट्राच्या वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धास्थान असलेली इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला आता चालना मिळाली आहे. राज्य सरकारच्या नगर विकास विभागाच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) मान्यतेचा प्रस्तावाला अखेर मान्यता मिळाली. त्यामुळे नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला.**




> इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पातून नदीसंवर्धन, पूरनियंत्रण, पाण्यावर प्रक्रिया आणि सौंदर्यीकरण अशा चारही बाबी साध्य केल्या जाणार आहेत. एकूण 526 कोटींचा हा प्रकल्प असून, अमृत 2.0 अभियानांतर्गत तो राबविला जाणार आहे. 40 आणि 20 एमएलडीचे हे दोन प्रकल्प असतील. यात पावसाचे पाणी साठवण्यासाठी जलनि:स्सारण प्रणाली, प्रदूषित पाणी मलनि:स्सारण प्रकल्पाकडे वळविण्यासाठी इंटरसेप्टर, पूर नियंत्रणासाठी दगडी बांधकाम करुन नदीच्या तटांचे सक्षमीकरण आणि नदीपात्राचे तटबंदीकरण, तसेच नदी तटावर हरित क्षेत्राचा विकास व वनसंवर्धनाद्वारे सुशोभिकरण अशी कामे एकत्रितपणे करण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायात अपार श्रद्धा असलेले श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू या दोन पवित्र स्थळांना जोडणाऱ्या इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला आज राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता मिळाली. सुमारे 35 लाख पिंपरी-चिंचवडकर यांच्या नागरी आरोग्याशी निगडित असलेला हा 526 कोटी रुपयांचा नदी सुधार प्रकल्प माझ्यासाठी विशेष जिव्हाळ्याचा आहे. कारण, इंद्रायणी नदी पुढे जाऊन वढू तुळापूर येथे संगम पावते. ज्या ठिकाणी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ आहे. पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील नागरी आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि तीर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प केंद्रबिंदू ठरणार आहे.
>
> **-देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री.

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला चालना देण्यासाठी आणि पर्यावरण प्रेमी व स्वयंसेवी संस्था प्रकल्पाचा सुधारीत विकास आराखडा तयार करावा यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. विधानसभा अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आणि तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे 2022 मध्ये मागणी लावून धरली होती.

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प अर्थात "नमामी इंद्रायणी"साठी सर्व प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, निधीची उपलब्धता याबाबत सातत्याने केलेले पाठवायला अखेर यश मिळाले आहे.

> राज्यातील तमाम वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आणि पिंपरी-चिंचवडकरांची जीवनवाहिनी असलेल्या इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता मिळाली. यापूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहकार्य केले. भाजपा महायुतीच्या सरकारने पिंपरी-चिंचवडकरांना दिलेल्या शब्द खरा केला. मुख्यमंत्री देवेंद्रजी आणि सरकारचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. आता प्रशासनाने पर्यावरण विषयक विविध बाबींची पूर्तता करावी आणि नदी सुधार प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करावी अशी अपेक्षा आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

विशेष म्हणजे, शहर आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी नदी सुधार प्रकल्पाचा विकास आराखडा अंतिम करताना महानगरपालिकेच्या MASTER PLAN मध्ये दर्शवल्यानुसार विविध ठिकाणी 60 एमएलडी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र सदर कामामध्ये प्रस्तावित केले आहे. तसेच, WATER ATM, PUBLIC TOILET, STREET FURNITURE, CHAIN LINK FENCING COMPOUND WALL आणि बायोडायव्हर्सिटी पार्क इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीची अपर मुख्य सचिव, (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली सदर प्रकल्पांचा अनुषंगाने आज बैठक झाली. सदर बैठकीत इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचा सविस्तर विकास आराखड्याला तांत्रिक समिमीची मान्यता मिळाली आहे.

---

# रिंगरोडसाठी एक इंचही जमीन देणार नाही

## मावळातील सहा गावातली शेतकऱ्यांचा इशारा ; आंदोलनाचाही पवित्रा

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पवन मावळच्या पूर्व भागातील नेरे, सांगवडे, दारुंब्रे, गोडुंब्रे, साळुंब्रे आणि धामणे या सहा गावांतील शेतकऱ्यांनी रिंगरोड आणि टीपी योजना कायमची रद्द करण्याचा जोरदार इशारा दिला आहे. जर या योजनेवर माघार घेतली नाही तर ते तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी व्यक्त केला आहे.**



पीएमआरडीने कोणालाही माहिती न देता या गावातून ६६ मीटर रुंदीचा रिंगरोड आणि टीपी योजना राबवण्याचा निर्णय घेतल्याचे शेतकऱ्यांनी म्हटले आहे. या प्रकल्पामुळे एकूण २४४२ एकर शेती जमीन नष्ट होणार आहे. सांगवडे गावातील ३१९ एकर ३२ आर, दारुंब्रे गावातील ३२५ एकर ८ आर, साळुंब्रे गावातील २६८ एकर ३५ आर, धामणे गावातील ५२४ एकर १२ आर, गोडुंब्रे गावातील २९८ एकर २५ आर आणि नेरे गावातील ३०९ एकर २७ आर अशी जमीन या योजनेअंतर्गत येत आहे.या सहा गावातील लोकांचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन शेती आहे. जर हा प्रकल्प मंजूर झाला, तर शेतकरी भूमिहीन होतील आणि त्यांना उपाशी राहावे लागेल.

यामुळे पवन मावळ भागातील विकास प्रलंबित राहील आणि गावांचे अस्तित्वच धोक्यात येईल. शेतकऱ्यांना यापुढे स्थलांतर करण्याची वेळ येऊ शकते, कारण त्यांचे आर्थिक व्यवस्थापन शेतीवर आधारित आहे. तसेच, स्थानिक संत तुकाराम सहकारी कारखाना ज्याला ऊस उत्पादनावर अवलंबून आहे, तोही या योजनेमुळे बंद पडण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे बांधकाम व्यवसायींनाही मोठा आर्थिक फटका बसणार असून, शेती संपुष्टात येईल. परिणामी, गावांचे अस्तित्वच नष्ट होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटते.या सहा गावातील एकही इंच जमीन आम्ही या योजनेला देणार नाही. सरकारने या प्रकल्पासाठी इतर पर्याय शोधावे. जर आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले, तर प्राण गमावण्याचीही वेळ आली तरी आम्ही माघार घेणार नाही, असा निर्धार परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे

शेतकरी कृती समितीचे सदस्य संभाजी राक्षे, रमेश राक्षे, भिवाजी राक्षे, सुनील राक्षे, भरत लिमण, बाबासाहेब बुचडे, किरण राक्षे, सागर राक्षे, पोपट राक्षे, कैलास मोकाशी, अंकुश राक्षे, विजय लिमण, तुषार मोकाशी, शेखर राक्षे, दशरथ राक्षे, रोहन जगताप, भोलेनाथ मोकाशी आणि नीलेश लिमण यांनी भूमिका मांडली.




**निधड्या छातीने खंबीरपणे उभा असलेला सह्याद्रीचा वाघ म्हणजे शरदचंद्र पवार साहेब. पवार साहेबांना महाराष्ट्राचा राखणदार म्हटल्यास वावगे ठरू नये. निराशेच्या घनदाट छायेने ग्रासलेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक तरुणांना पवार साहेबांचं आयुष्य आणि संघर्ष हा जगण्याची दिशा देणारे आहे. पवार साहेबांनी आयुष्यामध्ये अनेक राजकीय चढउतार बघितले परंतु डगमगतील, संकटांना घाबरतील ते पवार साहेब कसले!**

# 83 वर्षाचा तरुण,शरदचंद्र पवार !



2024 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सर्व राजकीय सहकारी सोडून गेल्यानंतर सुद्धा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये दिल्लीवरून निघालेल्या टोळधाडीच्या छाताडावर बसून विजयश्री खेचून आणला व शरद पवार नावाच्या *या सह्याद्रीच्या वाघाने दिल्लीचेही तक्थ राखतो मर्द मराठा* हे सिद्ध करून दाखविले. एकूणच काय तर *टायगर अभी जिंदा है..* पवार साहेब म्हणजे भल्याभल्यांना चित करणारे शक्तिशाली राजकीय कुस्तीपटू . 2024 अर्थातच यावर्षीची लोकसभा निवडणूक अनेक अंगाने महत्त्वाची होती. राज्याचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे सह अलीबाबा चाळीस चोरांची टोळी हाताशी धरून महाराष्ट्रामध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेवर दिवसा ढवळ्या दरोडा घातला. महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय लोकशाहीचे वस्त्रहरण करणारे अत्यंत घाणेरडे, फोडाफोडीचे राजकारण केले. दिल्लीवरून फूस असलेली महाराष्ट्रातील बीजेपी ची ही टोळधाड एवढ्यावरच न थांबता निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयाला हाताशी धरून बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसेना मूळ पक्ष व धनुष्यबाण चिन्ह हे सर्व एकनाथ शिंदेच्या टोळीला देऊन टाकले. ठाकरेंची राजकीय कारकीर्द नष्ट करण्याचा डाव आखण्यात आला. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षापासून अजित पवार व त्यांच्या सहकाऱ्यांना फोडून महायुतीत आणून महाराष्ट्राच्या तिजोरीच्या चाव्या त्यांच्या कमरेला बांधल्या. दिल्लीतून आखलेल्या कटकारस्थानानुसार महाराष्ट्रात अनाजी पंतांना, शरदचंद्र पवार साहेबांचा राष्ट्रवादी पक्ष फोडण्यात यश मतदारसंघांमध्ये पवारांची कन्या सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवारांना उभे करण्यात आले. देशाचे लक्ष लागलेल्या या मतदारसंघांमध्ये सुप्रिया सुळे ला पाडण्यासाठी व त्या माध्यमातून एकूणच महाराष्ट्रातील फुले,शाहू,आंबेडकरांचा विचार संपवण्यासाठी सर्व शक्ती पणाला लागल्या. मागे हटतील ते पवार साहेब कसले! एखाद्या नवयुकाला लाजवेल अशा अविर्भावात 83 वर्षाचे शरदचंद्र पवार साहेब राजकीय आखाड्यामध्ये मोदी, शहा च्या विरोधात दंड थोपटून पुन्हा एकदा पूर्ण ताकतीनिशी उतरले. रखरखत्या उन्हात पवार साहेबांनी आपल्या पक्षाच्या तसेच महाविकास आघाडीच्या इतर उमेदवारांना जिंकून आणण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 60 दिवसात 52 सभा व कितीतरी मेळावे घेतले. खरंतर इतरांसाठी 83 वर्षाचं वय म्हणजे नातवंडांना अंगाखांद्यावर खेळवण्याचं.*वय झालं,सोबतीला आता कोणी उरलं नाही म्हणून म्हणून पवार साहेब घरी बसले नाही.* त्या उलट दिल्लीसहित महाराष्ट्रातील राजकीय शत्रूंशी निधड्या छातीने लढून *गद्दारांना महाराष्ट्राच्या मातीत गाडणारा हा योद्धा.* पवार साहेब खंबीरपणे उभे ठाकले ते,या महाराष्ट्रातील तरुणांच्या, शेतकऱ्यांच्या,कष्टकऱ्यांच्या, महिलांच्या उज्वल भविष्यासाठी व एकूणच महाराष्ट्राला दिल्लीच्या हुकुमशहाच्या तावडीतून वाचवण्यासाठी. *मोदी,अमित शहा आणि फडणवीस यांना केवळ वरवर ठाकरे आणि पवार यांचा पराभव करायचा नसून ठाकरे च्या रूपाने प्रबोधनकारांचा आणि पवारांच्या रूपाने फुले शाहू आंबेडकरांचा विचार आणिमहाराष्ट्रातील ठाकरे व पवार या ब्रँडचे राजकारण संपवण्यासाठी इडी,सीबीआय, निवडणूक आयोग सारख्या विविध प्रशासकीय सरकारी यंत्रणांचा पुरेपूर कुटील हेतूने पद्धतशीरपणे वापर करण्यात आला. परंतु, *बाप बाप असतो* याप्रमाणे पवारांच्या पावर चा अंदाज दिल्लीच्या तक्तावर बसलेल्यांना आला नाही. *देशात 400 पार चे व महाराष्ट्रात 45 प्लस मोदी, शहा च्या दृष्टिकोनातून वयोवृद्ध10 पैकी 8 व महाविकास आघाडीला एकूण 30 जागा जिंकून देऊन मोदी, शहा, फडणवीस,शेलार, बावनकुळे, दरेकर यांना 10 जागेवर थांबायला लावून, मंत्री राहिलेल्या दिगजांचा नामुष्कीकारक पराभव करून त्यांना महाराष्ट्रामध्ये तोंड लपवायला सुद्धा जागा ठेवली नाही. असे चित केले.

## प्रासंगिक »

### नावडणुकांचा नगारा!

***राज्यातील पालिका व जि. प. निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर इतकी वर्षे रखडल्या, त्या हा मुद्दा सुटला नसला तरी अखेर होणार***

अधिकाराचे विकेंद्रीकरण हे लोकशाहीतील मूलभूत तत्त्व. तथापि आम्ही किती खरे लोकशाहीवादी याचा वारंवार पुनरुच्चार करणारे या तत्त्वाला पायदळी तुडवत असतात याची उदाहरणे अनेक. अलीकडे त्यात वाढच दिसते. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. निमित्त ठरले राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे. यावरून सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाला खडे बोल सुनावले. आता या निवडणुका येत्या ३१ जानेवारीपर्यंत घ्याव्या लागणार. त्यात पुन्हा मुदतवाढ मागितली जाऊ नये म्हणून न्यायालयाने मनुष्यबळ, ईव्हीएम आदी मुद्द्यांबाबत न्यायालयाकडे अर्ज करण्यासाठी दीड महिन्याची मुदतही ठरवून दिली. हे बरे झाले. त्यामुळे आयोगाला आता दिलेल्या मुदतीत निवडणुका घेण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला नाही.

भर उन्हात कुणाला काम करताना पाहून सूर्यालाही जेव्हा घाम फुटतो. मुसळधार पावसात कुणाला काम करताना पाहून पावसाच्या डोळ्यात पाणी येतं. कडाक्याच्या थंडीत विना स्वेटर वीना मफलरचा कुणी चाह, कुणी पेपर , कुणी कुठल्यातरी कामात गुंग असतो तेव्हा थंडीलाही हुडहुडी भरेल इतकं तो राबत असतो.

## बाप म्हणजे ; नुसतं देणं

तो दुसरा तिसरा कुणी नसून तो बाप असतो . ऋतुंचाही कंठ दाटून येतो जेव्हा बाप कामाला निघत असतो. घरात असताना आपल्या मुलांसोबत त्यांच्यापेक्षाही लहान अल्लळ,निरागस होऊन, त्यांच्याशी भांडण करत असतो अन् बाहेर निघताना जबाबदारीने, खंभिर होऊन, मोठ्या हिमतीने अख्ख्या जगाशी भिडत असतो, लढत असतो. बाहेर कणभर खर्च न करणारा घरी मनभरून बायको पोरांसाठी, आई वडिलांसाठी आणीत असतो. सगळ्यांना आनंदी बघताना पाहून हा आतल्या आत सुखावून जातो. समाधानाच्या झाडावर बसून सुफी गीत गात रमत असतो. आई वडील सोबत खेळणाऱ्या नातवांचे हसणे, खेळणे पाहून हा मनोमन स्वानादाचा महामेरू झालेला असतो. बाप घरात जास्त बोलत नसला तरी त्याच्या असण्याने घराला घरपण येतं. बाप घरच्यांसाठी खरा फॅमिलीमॅन असतो.बाहेर कष्ट करत असताना हजारो लोकांसोबत जुळाव लागतं . व्यक्ती तितक्या वृत्ती असतात. त्यात कुणी



मधाळ तर कुणी विषासम बोलणारे असतात, कुणी कपटी , कुणी कसे, तर कुणी कसे... यासर्व गोष्टी कामाधंद्यासह तो अगदी सहज पेलतो. घरी जर कुणी लहानगा आजारी पडला तर त्याच्या वेदना पाहून आभाळा येवढ्या बापालाही वेदना होतात. तोही आतल्या आत मुळूमुळू रडायला लागतो, अस्थिर होऊन आतल्या आत बरसायला लागतो . रात्र रात्र जागून चिमुरड्याची देखरेख करीत राहतो. ताप असल्यास डोक्याला पट्टी बदलत राहतो. वारंवार ताप पाहत राहतो. येवढेच काय डॉक्टर ला फोन करून करून कधी क्लिनिक ला नेवून त्रासावून सोडतो. जेव्हा बाळाला बरं वाटतं तेव्हा बाप्पाला जीवातजीव येतो. आनंदाच्या भरात देवळात जाऊन नारळ चढवणार , घरात भरपूर खायला आणणार , आणि सगळं लहानग्याला विचारून बरं. खरचं बाहेर जितका कठोर, व्यावहारिक तेव्हढा घरी हळवा, सांसारिक बाप असतो.

बाप म्हणजे कोळीनिच्या जाळ्यासारखा स्वतात गुंतलेला असतो. तो सतत एकाचे दोन, दोनाचे चार, चारचे आठ कसे होतील आणि घरच्या गरजा कशा भागवल्या जातील या चिंतेत , व्यथेत असतो. हीच चिंता, व्यथा पुढे पुढे या बाप्पाचे जीवन जगण्याचं गणित होऊन जाते. तो आयुष्यभर नफा तोटा जोडत राहतो . सुखं दुःखाचे ताळेबंद जुळवत राहतो. त्याला याची खंत वाटत नाही . कधी कधी स्वतःला पडताळून पाहताना घरी कुठे कमी होत आहे का? याची भिती त्याला रात्र रात्र भर झोपू देत नाही. अशा कित्येक रात्र तो जागत असतो . पुन्हा सकाळी सूर्याला हरवून तो कामाला निघालेला असतो. राहिलेली कमतरता पूर्ण करण्यासाठी पूर्ण जोशात तो थेट अख्या जगाशी भिडायला निघाला असतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ७७५ कोटींची गरज

## मुख्य सचिवांच्या बैठकीत नांदेड जिल्ह्याचे चित्र स्पष्ट

# पायाभूत सुविधांसाठी 775 कोटींची गरज

## ५७५ कोटींच्या निधीची मागणी



| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नांदेड जिल्ह्यात गेल्या दीड महिन्यामध्ये ठिकठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिके आणि शेतजमिनींचे पावणेसहाशे कोटींचे नुकसान झाले. तसेच या नैसर्गिक आपत्तीनंतर पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीसाठी आधीच्या आणि नव्या अहवालानुसार ७७५ कोटींची गरज असली, तरी संबंधित विभागांच्या तिजोरीत खडखडाट असल्याची माहिती मुख्य सचिवांनी बुधवारी घेतलेल्या बैठकीतून समोर आली.**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी केलेल्या भाषणामध्ये त्यांनी शेतपिकांच्या व जमिनीच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडे पावणेपाचशे कोटी रुपयांची तसेच पायाभूत सुविधांसाठी ३२३ कोटींची मागणी करण्यात आल्याचे सांगितले होते. त्यांनतर जिल्हा प्रशासनाकडून यासंबंधीचा सविस्तर अहवाल प्राप्त झाला. शेतजमीन आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी ५७५ कोटींच्या निधीची मागणी ११ सप्टेंबर रोजी करण्यात आल्याचे दिसून आले. दरम्यान, अतिवृष्टी आणि पुरामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नांदेड, नांदेड-वाघाळा मनपा व अन्य यंत्रणांच्या मालमत्तेच्या नुकसानीची माहिती समोर आली आहे. वेगवेगळ्या विभागांनी दुरुस्तीच्या कामांकरिता ३२३ कोटी ७१ लाखांची मागणी आधी केली होती. पूर्वीच्या अहवालामध्ये आता ४५१ कोटींची भर पडली असल्याचे सांगण्यात आले. नवीन अहवालानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाला पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी १८२ कोटी ४४ लाख, नांदेड जिल्हा परिषदेला ४१० कोटी ६६ लाख, नांदेड-वाघाळा मनपाला ६९ कोटी ९७ लाख, पाटबंधारे विभागाला १२ कोटी ७७ लाख, मृद व जलसंधारण विभागाला ९० कोटी ६० लाख, महावितरण कंपनीला ३०४ कोटी ५१ लाख, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेला १ कोटी ९८ लाख, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयास ४ कोटी २१ लाख असा ७७५ कोटींचा निधी लागणार असल्याचे मुख्य सचिवांकडे पाठविलेल्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी केलेल्या भाषणामध्ये त्यांनी शेतपिकांच्या व जमिनीच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडे पावणेपाचशे कोटी रुपयांची तसेच पायाभूत सुविधांसाठी ३२३ कोटींची मागणी करण्यात आल्याचे सांगितले होते. ५७५ कोटींच्या निधीची मागणी ११ सप्टेंबर रोजी करण्यात आल्याचे दिसून आले.दरम्यान, अतिवृष्टी आणि पुरामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नांदेड, नांदेड-वाघाळा मनपा व अन्य यंत्रणांच्या मालमत्तेच्या नुकसानीची माहिती समोर आली आहे. वेगवेगळ्या विभागांनी दुरुस्तीच्या कामांकरिता ३२३ कोटी ७१ लाखांची मागणी आधी केली होती. पूर्वीच्या अहवालामध्ये आता ४५१ कोटींची भर पडली असल्याचे सांगण्यात आले. नवीन अहवालानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाला पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी १८२ कोटी ४४ लाख, नांदेड जिल्हा परिषदेला ४१० कोटी ६६ लाख, नांदेड-वाघाळा मनपाला ६९ कोटी ९७ लाख, पाटबंधारे विभागाला १२ कोटी ७७ लाख, मृद व जलसंधारण विभागाला ९० कोटी ६० लाख, महावितरण कंपनीला ३०४ कोटी ५१ लाख, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेला १ कोटी ९८ लाख, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयास ४ कोटी २१ लाख असा ७७५ कोटींचा निधी लागणार असल्याचे मुख्य सचिवांकडे पाठविलेल्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

### तिजोरीमध्ये खडखडाट!

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी केलेल्या भाषणामध्ये त्यांनी शेतपिकांच्या व जमिनीच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडे पावणेपाचशे कोटी रुपयांची तसेच पायाभूत सुविधांसाठी ३२३ कोटींची मागणी करण्यात आल्याचे सांगितले होते. त्यांनतर जिल्हा प्रशासनाकडून यासंबंधीचा सविस्तर अहवाल प्राप्त झाला.

# ‘कस्तुरबा गांधी विद्यालया’चा प्रस्ताव बासनात

## ‘कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय’ योजनेच्या धर्तीवरही योजना सुरू



| सातारा |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीड व परभणीमधील ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी ‘कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय’ योजना सुरू करण्याचा निर्णय १६ सप्टेंबर २०२३ रोजीच्या छत्रपती संभाजीनगरमधील मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. त्यासाठी ८०.५० कोटींची घोषणाही करण्यात आली होती. परंतु, या निर्णयानंतर दोन वर्षांत केवळ प्रस्ताव पाठवण्यापुरतीच कार्यवाही झाली मंजुरी मिळण्याची प्रतीक्षाच आहे.**

मंत्रिमंडळातील उपरोक्त निर्णयानुसार बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी धारूर, गेवराई व वडवणी तालुके वगळून उर्वरित आठ तालुक्यांसाठी प्रत्येक तालुकास्तरावर २०० विद्यार्थिनी याप्रमाणे १ हजार ६०० विद्यार्थिनींसाठी निवासी स्वरूपाचे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनास पाठवण्यात आला आहे. त्यास अद्यापही मंजुरी मिळालेली नाही. जागा उपलब्धतेचा प्रस्ताव १२ मार्च २०२४ रोजी तर आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव १३ सप्टेंबर २०२४ रोजी पाठवण्यात आलेला आहे. त्यालाही वर्ष लोटले. अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. परभणी जिल्ह्यातील सोनपेठ व पालम तालुक्यामध्येही कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरू करण्याचा याच मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता.

### ९५ कोटींचा निधी घोषित केला

सुरू करण्याचा प्रस्ताव असून, त्यासाठी २० कोटी ७३ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे. पैकी एक नवा पैसाही अद्याप प्राप्त नसून, केवळ जागेची उपलब्धता झाल्याचा एक अहवाल शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून पाठवण्यात आला आहे. यासंदर्भात शासनस्तरावरून पुढील कार्यवाही अप्राप्त असल्याचेही सांगण्यात आले.मराठवाड्यातील ७६ तालुक्यांमधील स्वातंत्र्यसेनानींच्या गावांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतून एका शाळेची निवड करण्याचाही एक निर्णय घेण्यात आला होता. निवडलेल्या शाळेत खोल्यांचे बांधकाम करण्यात येणार असल्याची माहिती असून, त्यावर सुमारे सव्वा कोटी खर्च होणार आहे. यासाठी ९५ कोटींचा निधी घोषित केला आहे.

## ५० टक्के टॅरिफचा फटका | मुख्य आर्थिक सल्लागारांचं मोठं भाष्य

# ट्रम्प भारतावरील टॅरिफ हटवणार?

## भारत-अमेरिकेत करार होण्याची शक्यता



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांचा जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत असल्याचं पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांनी आतापर्यंत घेतलेल्या निर्णयांपैकी आयातशुल्क धोरणाची मोठी चर्चा आहे. अमेरिकेने आतापर्यंत अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयातशुल्क लादलं आहे. भारतावर देखील २५ टक्के आयातशुल्क आणि २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क असं एकूण ५० टक्के टॅरिफ लादलं आहे. याचा फटका भारताला सहन करावा लागत आहे.**

डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारतावर टीका करतानाही पहायला मिळाले. मात्र, काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी चीनचा दौरा केला आणि त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताबाबत बोलण्याचा सूर बदलल्याचं चित्र पाहायला मिळालं. यातच ट्रम्प यांनी मोदींना फोन करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यामुळे भारत आणि अमेरिकेत लवकरच व्यापार करार होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. मात्र, असं असलं तरी ट्रम्प भारतावरील अतिरिक्त टॅरिफ हटवणार का? असा सवाल उपस्थित केला जात होता.याबाबत आता भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी मोठं भाष्य केलं आहे. 'अमेरिकेने भारतावर लादलेल्या काही आयातींवर लादलेला दंडात्मक कर ३० नोव्हेंबरनंतर मागे घेतला जाईल', असा दावा व्ही. अनंत नागेश्वरन यांनी केला आहे. त्यामुळे भारत-अमेरिका व्यापार निर्बंधांमध्ये शिथिलता येण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.कोलकाता येथील एका आयोजित कार्यक्रमात बोलताना व्ही. अनंत नागेश्वरन म्हणाले की, "अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयातशुल्कबाबत बोलण्यासाठी मी थोडा वेळ घेईन. पण, २५ टक्के परस्पर शुल्क आणि २५ टक्के अतिरिक्त कर दोन्ही अपेक्षित नव्हते. मला अजूनही वाटतं की काही राजकीय परिस्थितीमुळे २५ टक्के अतिरिक्त कर लागू झाला असेल. मात्र, गेल्या काही आठवड्यांतील घडामोडी पाहिल्या तर मला असं वाटतं की ३० नोव्हेंबरनंतर अतिरिक्त कर राहणार नाही. मला विश्वास आहे की पुढच्या काही महिन्यांत दंडात्मक शुल्कावर आणि परस्पर शुल्कावर एक तोडगा निघेल."डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी तथा व्हाईट हाऊसचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत नुकताच एक दावा केला होता. 'भारत वाटाघाटीच्या टेबलावर आहे', असं पीटर नवारो यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या दाव्यामुळेडोनाल्ड ट्रम्प नरमले का? अशी चर्चा आता रंगल्याचंही पाहायला मिळालं. दरम्यान, पीटर नवारो यांच्या या विधानामुळे भारतावरील टॅरिफ कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारतावर टीका करतानाही पहायला मिळाले. मात्र, काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी चीनचा दौरा केला आणि त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताबाबत बोलण्याचा सूर बदलल्याचं चित्र पाहायला मिळालं. यातच ट्रम्प यांनी मोदींना फोन करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यामुळे भारत आणि अमेरिकेत लवकरच व्यापार करार होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. मात्र, असं असलं तरी ट्रम्प भारतावरील अतिरिक्त टॅरिफ हटवणार का? असा सवाल उपस्थित केला जात होता.याबाबत आता भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी मोठं भाष्य केलं आहे. 'अमेरिकेने भारतावर लादलेल्या काही आयातींवर लादलेला दंडात्मक कर ३० नोव्हेंबरनंतर मागे घेतला जाईल', असा दावा व्ही. अनंत नागेश्वरन यांनी केला आहे. त्यामुळे भारत-अमेरिका व्यापार निर्बंधांमध्ये शिथिलता येण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.कोलकाता येथील एका आयोजित कार्यक्रमात बोलताना व्ही. अनंत नागेश्वरन म्हणाले की, "अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयातशुल्कबाबत बोलण्यासाठी मी थोडा वेळ घेईन. पण, २५ टक्के परस्पर शुल्क आणि २५ टक्के अतिरिक्त कर दोन्ही अपेक्षित नव्हते.

### अतिरिक्त टॅरिफ हटवणार का?

मात्र, गेल्या काही आठवड्यांतील घडामोडी पाहिल्या तर मला असं वाटतं की ३० नोव्हेंबरनंतर अतिरिक्त कर राहणार नाही. मला विश्वास आहे की पुढच्या काही महिन्यांत दंडात्मक शुल्कावर आणि परस्पर शुल्कावर एक तोडगा निघेल."डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी तथा व्हाईट हाऊसचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत नुकताच एक दावा केला होता. 'भारत वाटाघाटीच्या टेबलावर आहे.

# ट्रम्प यांचा संसदेबाहेर १२ फुटी पुतळा

## चेहऱ्यावर हास्य अन् हातात बिटकॉइन, काय आहे खास?



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे कायम कोणत्या न कोणत्या कारणांनी चर्चेत असतात. आता पुन्हा एका वेगळ्या कारणांनी डोनाल्ड ट्रम्प चर्चेत आले आहेत. अमेरिकेच्या संसदेबाहेर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचा १२ फूट उंच भव्य असा सोनेरी पुतळा उभारण्यात आला आहे. तसेच या पुतळ्यामध्ये ट्रम्प यांच्या हातात बिटकॉइन दिसत आहे.**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या पुतळ्याला पाहण्यासाठी अमेरिकन नागरिक गर्दी करत आहेत, तर दुसरीकडे या पुतळ्यावरून वादही सुरू झाला आहे. ट्रम्प यांच्या पुतळ्याचं अनावरण नेमकं अशावेळी झालं आहे की जेव्हा फेडरल रिझर्व्हने २५ टक्के व्याजदर कपातीची घोषणा केली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.एका वृत्तानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांच्या या पुतळ्याला क्रिप्टोकरन्सी गुंतवणूकदारांनी निधी दिल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच सोशल मीडियावर पुतळ्याच्या संदर्भातील काही पोस्ट शेअर करण्यात येत आहेत. यामध्ये क्रिप्टोकरन्सी समर्थकांनी ट्रम्प यांच्या या पुतळ्याबाबत कौतुक केलं आहे.फेडरल रिझर्व्हने डिसेंबर २०२४ नंतर पहिल्यांदाच त्यांच्या प्रमुख व्याजदरात कपात जाहीर केली आहे. या कपातीमुळे अल्पकालीन व्याजदर ४.३ टक्क्यांवरून अंदाजे ४.१ टक्क्यांपर्यंत कमी होईल. बँकेने खुलासा केला आहे वर्षी व्याजदरात आणखी दोनदा कपात करण्याची योजना आखत आहेत. परंतु २०२६ मध्ये फक्त एकदाच कपात करण्याची योजना आहे. वॉल स्ट्रीटमध्ये नाराजी पसरण्याची शक्यता आहे

### पुन्हा एका कारणांनी ट्रम्प चर्चेत

.यावरून डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या प्रमुखांमधील संबंधांबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत. आता या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदर कमी करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयावर ट्रम्प काय प्रतिक्रिया देतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे कायम कोणत्या न कोणत्या कारणांनी चर्चेत असतात. आता पुन्हा एका वेगळ्या कारणांनी डोनाल्ड ट्रम्प चर्चेत आले आहेत.

# आई कुठे काय करते'फेम अभिनेत्री रमली शेतकामात

मराठी मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळी ही त्यांच्या साधेपणसाठी ओळखली जातात. कलाकार किंवा सेलिब्रिटी असल्याचा आव न आणता अगदी सामान्य माणसाप्रमाणे हे कलाकार वागतात. कलाकारांचा हाच साधेपणा चाहत्यांना भावतो. अनेक कलाकार सोशल मीडियाद्वारे त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक अपडेट्स शेअर करत असतात, ज्यातून त्यांचे साधेपणा दिसून येतो. अशीच आपलं साधेपण जपणारी अभिनेत्री म्हणजे आश्विनी महांगडे.'आई कुठे काय करते' या मालिकेमधून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री अश्विनी महांगडे सोशल मीडियावर कायमच सक्रिय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असते. याशिवाय तिच्या आयुष्यातल्या अनेक अपडेट्सही देत असते. अशातच तिने नुकताच शेअर केलेला एक व्हिडीओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. अश्विनीने शेअर केलेल्या या व्हिडीओ मध्ये ती शेतीकाम करत असल्याचे पाहायला मिळत आहे. शेतीकाम करतानाचा व्हिडीओ शेअर करत अश्विनीने तिच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. या व्हिडीखालील कॅप्शनमध्ये अश्विनी म्हणते,"शेती हा एक संस्कार आहे, पुढच्या पिढीला तो देणे गरजेचे आहे. आज मुलांच्या हातात मोबाईल आहे पण वेळ आली



तर स्वतःच्या पोटासाठी पिकवताही यायला हवे. मनगटात ताकद हवी आणि पाय जमिनीवर घट्ट रोवून उभे राहता यायला हवे."यापुढे तिने असं म्हटलं,"दुसऱ्यांना देण्याची दानत ही शेतकऱ्यांकडेच असते आणि हा गुण आपल्या मुलांनी घ्यायला हवा. आज रवी आणि वहिनींनी यासाठी मुलांना आमच्याकडे आणले. वेद आणि आर्या तर गुणी आहेतच, त्यांनी आनंदाने इवल्यश्या डोळ्यात सगळे साठवून घेतलं." अश्विनीने शेअर केलेल्या या व्हिडीओला चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे.तसेच अभिनेत्रीच्या या साधेपणाचं कौतुकही केलं आहे. या व्हिडीओ खाली चाहत्यांनी "खरंच तुमचा खूप अभिमान आहे,"अभिनेत्री असूनही मदत म्हणून शेतात काम करतेस हेच तुझं मोठेपण आहे," "हे जपलं पाहिजे", "खूप छान," "म्हणूनच तुम्ही अभिनेत्री म्हणून आम्हाला आवडता", "उत्तम अभिनेत्री असण्याबरोबरच उत्तम माणूस कसं असावं हे तुमच्याकडून शिकण्यासारखं आहे.

## जुई गडकरीने दिलं खास गिफ्ट

'ठरलं तर मग' मालिकेचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. ही सिरियल टीआरपीमध्ये देखील कायम अग्रेसर असते. या मालिकेतील सगळेच कलाकार गेल्या अडीच वर्षात घराघरांत लोकप्रिय झाले आहेत. यापैकी अर्जुनच्या सख्ख्या बहिणीची म्हणजेच अस्मिताची भूमिका साकारणाऱ्या मोनिका दबाडेने काही महिन्यांपूर्वीच ती आई होणार असल्याची गूडन्यूज प्रेक्षकांना दिली होती. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस 'ठरलं तर मग' मालिकेतून मोनिकाने काही महिन्यांसाठी ब्रेक घेतला.अभिनेत्रीने लेकीचं नाव वृंदा असं ठेवलं आहे. मध्यंतरी 'ठरलं तर मग' मालिकेतील कल्पना म्हणजेच अभिनेत्री प्राजक्ता दिघे यांनी मोनिकासाठी लेकीच्या जन्मानंतर खास लाडू बनवून पाठवले होते. आता त्यांच्या पाठोपाठ मालिकेची मुख्य नायिका जुई गडकरीने सुद्धा वृंदाला खास गिफ्ट दिलं आहे.

## आयशाने दिलं चांगलंच उत्तर

बऱ्याच काळानंतर 'वॉटेड' फेम अभिनेत्री आयशा टाकिया काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसली होती. यादरम्यानचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आयशाच्या लूकवरून लोकांनी तिला ट्रोल केलं. "प्लास्टिक सर्जरी करून हिने स्वतःचा चेहरा बिघडवला', अशा आशयाच्या अनेक प्रतिक्रिया लोकांनी तिच्या व्हिडीओवर दिल्या होत्या. एवढंच नाहीतर लोकांनी तिला शरीर रचनेवरून ट्रोल केलं होतं. मात्र आता ट्रोलर्सला आयशाने चांगलंच उत्तर दिलं आहे.अभिनेत्री आयशा टाकियाने ट्रोल झाल्यानंतर सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट लिहिली आहे. आयशा म्हणाली, "मला हे सांगण्याची गरज आहे. दोन दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबात मेडिकल इमरजेंसी असल्यामुळे गोव्याला निघाले होते. माझी बहीण हॉस्पिटलमध्ये आहे. यादरम्यान मला विमानतळावर काही पापाराझींना थांबवलं. त्यामुळे काही वेळात मी पापाराझींसाठी पोझ दिल्या. पण आपल्या देशात माझ्या लूकवर बोलण्याशिवाय इतर कोणतेही महत्त्वाचे मुद्दे नाहीत, असं मला वाटतं. अनेक जण बेताल मतं मांडत आहेत. मला कसं दिसायला पाहिजे होतं आणि कसं नाही याविषयी बोललं जात आहे. पण मला कुठलाही चित्रपट करण्यात किंवा पुन्हा कमबॅक करण्यात अजिबात रस नाही.



## अशी' मिळाली अक्षयला 'जानवर'मधील भूमिका

अक्षय कुमार हा आज बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेता म्हणून ओळखला जातो. त्याचा चाहतावर्गही खूप मोठा आहे. पण, करिअरच्या सुरुवातीला मात्र अभिनेत्याच्या अनेक चित्रपटांना अपयश आलेलं. १९९७-१९९९ हा काळ असा होता, जेव्हा अक्षय कुमारने सर्वाधिक फ्लॉप चित्रपट दिलेले. पण, कलाकार म्हटलं की चढ-उतार येतच असतात. असंच काहीसं अक्षयबरोबरही झालं. अक्षय कुमारने 'जानवर' चित्रपटात बादशाह म्हणजेच बाबू लोहार ही भूमिका साकारली होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली होती. महत्त्वाचं म्हणजे यातील अक्षय कुमारच्या कामाचं अनेकांनी कौतुक केलं होतं. पण, तुम्हाला माहीत आहे का? या चित्रपटासाठी अक्षय कुमार पहिली पसंती नव्हता, तर एक वेगळाच अभिनेता चित्रपटाचा नायक असणार होता. चित्रपटाचे दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबत सांगितलेलं. सुनील दर्शन म्हणाले, "या चित्रपटासाठी पहिली पसंती ही अभिनेता सनी देओलला होती. आम्ही चित्रपटाचं काम सुरू करणार होतो, पण तितक्यात आमचं त्याच्याबरोबर काही गोष्टींवरून वाद झाले. ते वाद आजही मिटलेले नाहीत, त्यामुळे मी ठरवलं की या चित्रपटासाठी दुसरा अभिनेता शोधू."मुख्य नायकाच्या शोधात असताना सुनील दर्शन यांनी अभिनेता अजय देवगणला यासाठी विचारलं. ते म्हणाले, "अजय व मी एका शनिवारी भेटून याबद्दल चर्चा केली आणि हा चित्रपट करायचं ठरलं. सोमवारी सगळं ठरवून कामाला सुरुवात करणारच होतो तेवढ्यात रविवारी सगळंच बदलून गेलं". सनी देओलसह वाद झाल्यानंतर सुनील यांनी अजय देवगण व काजोलबरोबर हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला होता. पण, त्याचदरम्यान या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. सुनील दर्शन यांना त्यादरम्यान अक्षय कुमाराचा फोन आला होता, ज्याला ते कधीच भेटले नव्हते. सुनील म्हणाले, "त्याने मला फोन करून म्हटलं, त्याला शक्य तितक्या लवकर मला भेटायचं आहे.

## नायिका उधळून लावणार खलनायिकांचा कट



'स्टार प्रवाह'वर यंदा वटपौर्णिमानिमित्त "महानायिकांची महावटपौर्णिमा" असा विशेष भाग दाखवला जाणार आहे. यानिमित्त वाहिनीवरील विविध मालिकेतील नायिका एकत्र आल्या आहेत. या विशेष भागाचं मालिकेतील नायक, नायिका आणि खलनायिका यांनी एकत्रित चित्रीकरण केलं आहे, त्यामुळे यंदा वटपौर्णिमेला प्रेक्षकांना हा विशेष भाग पाहता येणार आहे.जुई गडकरीने नुकतीच यानिमित्ताने एक मुलाखत दिली आहे. जुई 'स्टार प्रवाह'वरील 'ठरलं तर मग' या मालिकेत सायली हे पात्र साकारत आहे. यावेळी सायली वटपौर्णिमेनिमित्त पारंपरिक अंदाजात तयार झाली आहे, तर यावेळी सायलीने घेतलेल्या उखाण्याने लक्ष वेधलं आहे. तिने उखाणा घेत म्हटलं, "वटपौर्णिमेला पूजा होते ते झाड आहे वट, स्टार प्रवाहाच्या सर्व महानायिका उधळून लावणार खलनायिकांचा कट."'स्टार प्रवाह'वरील 'ठरलं तर मग', 'प्रेमाची गोष्ट', 'थोडं तुझं थोडं माझं','लग्नानंतर होईलंच प्रेम', 'येड लागलं प्रेमाचं' यांसारख्या इतर मालिकांमधील नायिकांनी एकत्र येत वटपौर्णिमेनिमित्त या खास भागाचं एकत्रित चित्रीकरण केलं आहे.

यावेळी त्यांच्याबरोबर वाहिनीवरील सर्व नायकही उपस्थित असून नायिकांवर आलेल्या संकटापासून ते त्यांच्या पत्नीची कशी रक्षा करणार हे पाहायला मिळणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच या सीनचं शूटिंग झालं असून, यावेळी सर्व नायक गुंडांशी एकहात करताना दिसले. हा सीन शूट करताना कलाकारांची कशी तारांबळ उडाली, याबाबत त्यांनी अनेक मुलाखतींमधून सांगितलं आहे. एकूणच यंदाची वटपौर्णिमाही मालिकाप्रेमींसाठी खास ठरणार आहे.

## बांगलादेशची वाईल्ड कार्ड एन्ट्री

## सुपर ४ मध्ये जाणारे ४ संघ ठरले

# श्रीलंकेचा अफगाणिस्तानवर विजय!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

### ६ गडी राखून विजय मिळवला




**आशिया चषक २०२५ स्पर्धेतील ११ वा सामना श्रीलंका आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना सुपर ४ मध्ये प्रवेश करण्याच्या दृष्टीने ३ संघांसाठी अतिशय महत्वाचा होता. अफगाणिस्तानला सुपर ४ मध्ये प्रवेश करण्यासाठी हा सामना जिंकायचा होता. तर श्रीलंकेला धावांचा पाठलाग करताना १०१ धावांचा पल्ला गाठायचा होता. तर अफगाणिस्तानचा पराभव होताच बांगलादेशचा संघ सुपर ४ मध्ये प्रवेश करणार होता. अफगाणिस्तानने हा सामना जिंकण्यासाठी श्रीलंकेसमोर १७० धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने ६ गडी राखून विजय मिळवला. यासह श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे.**

श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी २० षटकात १७० धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेकडून सलामीला आलेल्या पथुम निसंकाला हवी तशी सुरूवात करून देता आली नाही. तो अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. मात्र सलामीला आलेला कुसल मेंडिस शेवटपर्यंत उभा राहिला आणि श्रीलंकेला विजय मिळवून दिला. त्याने नाबाद ७४ धावांची खेळी. तर कुसल परेराने २८ धावा केल्या. कर्णधार चरिथ असलंकाने १७ धावा केल्या. या विजयासह श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे. तर अफगाणिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला असून बांगलादेशचा संघ ब गटातून सुपर ४ फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे. तर बांगलादेशचा संघ दुसरा संघ ठरला आहे. या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांअखेर ८ गडी बाद १६९ धावा केल्या. या सामन्यात अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबीने सर्वाधिक ६० धावांची खेळी केली. सलामीला फलंदाजी करताना रहमानुल्लाह गुरबाजने १४ धावा केल्या. तर सेदीकुल्लाह अटलने १८ धावा केल्या. इब्राहिम जदरानने २४ धावा केल्या. मोहम्मद नबी सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने ३ चौकार आणि ६ षटकारांच्या साहाय्याने ६० धावांची खेळी केली. राशिद खानने २४ धावा केल्या. २० षटकांअखेर अफगाणिस्तानने ८ गडी बाद १६९ धावा केल्या.या स्पर्धेतील अ गटातून भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी सुपर ४ मध्ये आधीच प्रवेश केला होता. तर ग्रुप बी मध्ये श्रीलंका, अफगाणिस्तान आणि बांगलादेश या तिन्ही संघांमध्ये जोरदार लढत पाहायला मिळाली. अफगाणिस्तानला सुपर ४ मध्ये प्रवेश करण्यासाठी केवळ हा सामना जिंकायचा होता. पण ते असं करू शकलेले नाहीत. त्यामुळे बांगलादेशचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे. तर धावांचा पाठलाग करत असताना १०१ धावा करताच श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला. त्यामुळे श्रीलंकेने हा सामना गमावला असता तरीदेखील श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला असता. अशा स्थितीत, बांगलादेशचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला असता. येत्या शनिवारपासून सुपर ४ फेरीतील सामन्यांना सुरुवात होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणारा सामना २१ सप्टेंबरला होणार आहे.श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी २० षटकात १७० धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेकडून सलामीला आलेल्या पथुम निसंकाला हवी तशी सुरूवात करून देता आली नाही. तो अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. मात्र सलामीला आलेला कुसल मेंडिस शेवटपर्यंत उभा राहिला आणि श्रीलंकेला विजय मिळवून दिला. त्याने नाबाद ७४ धावांची खेळी. तर कुसल परेराने २८ धावा केल्या. कर्णधार चरिथ असलंकाने १७ धावा केल्या. या विजयासह श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे. तर अफगाणिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला असून बांगलादेशचा संघ ब गटातून सुपर ४ फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे. तर बांगलादेशचा संघ दुसरा संघ ठरला आहे.

### मेंडिस शेवटपर्यंत उभा राहिला

या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांअखेर ८ गडी बाद १६९ धावा केल्या. या सामन्यात अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबीने सर्वाधिक ६० धावांची खेळी केली. सलामीला फलंदाजी करताना रहमानुल्लाह गुरबाजने १४ धावा केल्या.

# ओमानविरूद्ध इंडियाची प्लेइंग ११ बदलणार?

## संघात 3 बदल होणार; या खेळाडूंना मिळू शकते संधी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज




**आशिया चषक २०२५ स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत दमदार कामगिरी केली आहे. सूर्यकुमार यादव पहिल्यांदाच मोठ्या स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे. पाहिल्या सामन्यात यूएई आणि दुसऱ्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा एकतर्फी पराभव केला. यासह स्पर्धेतील सुपर ४ मध्ये प्रवेश केला आहे. भारताचा पुढील सामना ओमानविरूद्ध होणार आहे. या सामन्यासाठी भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये बदल पाहायला मिळू शकतो.**

भारतीय संघाने आधीच सुपर ४ मध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे संघ व्यवस्थापकांकडून प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. माध्यमातील वृत्तानुसार ,भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये ३ मोठे बदल पाहायला मिळू शकतात. ओमानविरूद्ध होणाऱ्या सामन्यात भारतीय संघाच्या टॉप ऑर्डरमध्ये बदल केला जाऊ शकतो. रिंकू सिंगला फलंदाजीत आपली जादू दाखवण्याची संधी दिली जाऊ शकतो. जर रिंकू सिंगला प्लेइंग ११ मध्ये संधी दिली गेली, बाहेर कोणाला बसवलं जाणार हे पाहणं महत्वाचं ठरेल.स्पर्धेतील सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये अर्शदीप सिंगला प्लेइंग ११ मध्ये संधी देण्यात आलेली नाही. त्याला ओमानविरुद्धच्या सामन्यात संधी दिली जाऊ शकते. त्यामुळे जसप्रीत बुमराहला विश्रांती दिली जाऊ शकते. अर्शदीप विकेट्सची शंभरी गाठण्याच्या उंबरठ्यावर आहे. यासह वेगवान गोलंदाज हर्षित राणाला देखील प्लेइंग ११ मध्ये संधी दिली जाऊ शकते. त्याला संधी देण्यासाठी शिवम दुबेला विश्रांती दिली जाऊ शकते. ओमानविरूद्ध होणारा सामना हा भारतीय संघासाठी फार महत्वाचा नसणार आहे.

### अशी असू शकते संघाची प्लेइंग

कारण भारतीय संघाने आधीच सुपर ४ फेरीतील स्थान निश्चित केलं आहे. त्यामुळे भारतीय संघाकडे बाकावर असलेल्या खेळाडूंना प्लेइंग ११ मध्ये स्थान देण्याची संधी असणार आहे. सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, शुभमन गिल, संजू सॅमसन, तिलक वर्मा/रिंकू सिंग, हर्षित राणा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, अर्शदीप सिं, वरुण चक्रवर्ती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 19 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### विद्यार्थ्यांनी 19 वर्षाखालील गटात उत्तुंग कामगिरी

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या खेळाडूंचं यश!

## शिक्षण विश्व :ॲक्रोबॅटिक स्पर्धेत 11 सुवर्ण पदकांची कमाई

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड |प्रतिनिधी:पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १९ वर्षाखालील गटात ॲक्रोबॅटिक स्पर्धेत उत्तुंग कामगिरी करत ११ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई केली आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय ॲक्रोबॅटिक स्पर्धा २०२५ - २६ (दि. १३) निगडी येथील एलाइट फिटनेस अकॅडमी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेत पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कौशल्यपूर्ण सादरीकरण केले. यामध्ये एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील विविध गटातील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी केली. यामध्ये मुलींच्या संघात इयत्ता ६ वी मधील वीरा काटकर, वैदेही निकम आणि आर्या थोरात यांनी सुवर्ण पदक जिंकले. सावनी बडवे (इयत्ता ६ वी) आणि ओम पाटील (इयत्ता ९ वी) यांनी मिश्र जोडीत सुवर्ण पदक मिळवले.

मुलांच्या संघात इयत्ता ८ वी मधील रुद्र जंगलीवाड, अमित कोडगुनूरा, राजवीर अंजुरे, आदित्य खाडे, पवन खैरनार आणि इयत्ता ६ वी मधील अनय पवार यांनी सुवर्ण पदक मिळवून शाळेचा मान वाढविला.

स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलेल्या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुलींच्या संघात आबोली डोंबाळे (इयत्ता ७ वी) आणि श्रावणी भोंडवे (इयत्ता ७ वी) यांनी रौप्य पदक पटकावले.

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा व क्रीडाशिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील विभागीय आणि राज्य स्पर्धेसाठी यशस्वी होण्यास शुभेच्छा देऊन कौतुक केले.

---

### नमो युवा रन" – 'एक दौड मोदीजी के नाम'

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी 'नमो युवा रन' मॅरेथॉन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी : भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'नमो युवा**

NAMO YUVA RUN
FOR A NASHA MUKT BHARAT



ही मॅरेथॉन रविवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता पिंपळे सौदागर येथील लिनीयर गार्डन, कोकणे चौक ते ८ टु ८० पार्क येथे केले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व पिंपरी चिंचवड भाजपा शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पिंपरी चिंचवडचे माजी पोलीस आयुक्त आयपीएस अधिकारी कृष्ण प्रकाश यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

त्याचप्रमाणे आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे तसेच भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष श्री.अनुप मोरे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड अध्यक्ष दिनेश यादव, भाजपा युवा मोर्चा सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, नमो युवा रनचे संयोजक अमृत मारणे, युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवणे, देशभक्ती आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. ही मॅरेथॉन रन सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी आयोजित केली असून सहभागी स्पर्धकांना नोंदणी व प्रवेश विनामूल्य आहे.

स्पर्धेचे आयोजक भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले असून जास्तीत जास्त युवकांनी व नागरिकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे यांनी केले आहे.

## डॉ.डी.वाय.पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घेतले

# प्रशासकीय कामकाजाचे धडे!

### शिक्षण विश्व; विद्यार्थिनींनी महापालिकेला भेट देऊन जाणून घेतली शहर विकासाची प्रक्रिया

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयात कला (अर्थशास्त्र) शाखेतील विद्यार्थिनींनी पिंपरी चिंचवड महापालिकेला आज भेट दिली. यावेळी त्यांना महापालिकेचे प्रशासकीय कामकाज कसे चालते, नागरिकांना महापालिकेकडून कोणकोणत्या अत्यावश्यक व इतर सुविधा दिल्या जातात, महापालिकेमध्ये कोणकोणते विभाग असतात... अशी विविध माहिती देण्यात आली.**



महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, अजय सूर्यवंशी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी विद्यार्थिनींना महापालिकेतील विविध प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती दिली. याप्रसंगी माहिती व जनसंपर्क विभागाचे मुख्य लिपिक देवेंद्र मोरे, लिपिक अभिजित डोळस, महाविद्यालयाचे प्रा. शरद जगताप, प्रा. अश्विनी घोडके यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

> पिंपरी चिंचवड महापालिकेला दिलेल्या भेटीतून आम्हाला शहर विकासाची संपूर्ण प्रक्रिया, त्यातील आव्हाने आणि त्यावर घेतल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती मिळाली. हा अनुभव आमच्यासाठी खूप प्रेरणादायी ठरला. यानिमित्ताने शहराच्या विकासात महापालिकेची भूमिका किती महत्त्वाची असते, हे देखील समजले. – **ईश्वरी तलवार,**
> विद्यार्थिनी, डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय

महापालिकेतील स्थापत्य विभाग सर्वात प्रथम या विद्यार्थिनींना दाखवण्यात आला. येथे देवन्ना गट्टूवार यांनी शहरातील रस्ते, स्थापत्य विभाग, इमारत, बांधकाम यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन शहर नियोजन व विकासाची माहिती दिली. त्यानंतर पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागात अजय सूर्यवंशी यांनी विद्यार्थिनींना शहरातील पाणीपुरवठा संरचना, पाणीपुरवठ्याचे स्रोत, वितरण व्यवस्था, पाणी साठवण व शुद्धीकरण प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात विद्यार्थिनींना महापालिकेकडून करण्यात येत असलेल्या विविध विकासकामांचे, शहरासाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मूलभूत सेवांचे तसेच नाविन्यपूर्ण डिजिटल उपक्रमांची माहिती देणारी चित्रफीत दाखवण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी महापालिकेच्या विविध विभागांना दिलेल्या भेटीमुळे प्रशासनाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.

> महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने आज महाविद्यालयातील विद्यार्थिनींची पिंपरी चिंचवड महापालिकेला भेट आयोजित केली होती. यावेळी महापालिकेतील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली. हा अनुभव विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आयुष्यात अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
> **–प्रा. शरद जगताप,**
> डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय

> आम्ही आतापर्यंत फक्त पुस्तकातूनच महापालिकेच्या कामकाजाची माहिती घेतली होती. मात्र प्रत्यक्ष विभागांना भेट दिल्यामुळे आणि अधिकाऱ्यांसोबत थेट संवाद साधल्यामुळे खऱ्या अर्थाने प्रशासन कसे चालते, हे जाणून घेण्याची संधी मिळाली. ही भेट आमच्या भविष्यातील करिअरसाठी प्रेरणादायी ठरेल.
> **–मिताली वाघ,** विद्यार्थिनी, डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय



Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046